# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः19.11.2024** **वारःमंगळवार**

---

**ठळक बातम्या**

- विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराची सांगता; अखेरच्या दिवशी सर्वच पक्षांच्या वरिष्ठ नेत्यांचा झंजावाती प्रचार
- राज्यातल्या 288 विधानसभा मतदार संघात आणि नांदेड लोकसभा मतदारसंघात पोटनिवडणुकीसाठी उद्या मतदान
- मतदानासाठी निवडणूक यंत्रणा सज्ज; 9 कोटी 70 लाखांहून अधिक मतदारांसाठी 1 लाख 427 मतदान केंद्रांवर होणार मतदान

आणि

- महिलांच्या आशिया चषक हॉकी स्पर्धेत आज उपांत्य फेरीत भारत जपान आमने सामने

**प्रचार सांगता**

विधानसभा निवडणुकीसाठीच्या प्रचाराची काल सांगता झाली. काल अखेरच्या दिवशी सर्वच पक्षांच्या वरिष्ठ नेत्यांच्या जाहीर सभांचा धडाका पाहायला मिळाला. सत्ताधारी आणि विरोधकांकडून आरोप प्रत्यारोपांच्या फैरी झडल्या. तर उमेदवारांनी प्रचार फेरी, दुचाकी फेरी, कोपरा सभा आणि प्रत्यक्ष संपर्क साधत मतदारांना आकर्षित करण्याचा प्रयत्न केला. प्रचाराच्या सांगतेच्या दिवशी महायुती आणि महाविकास आघाडीच्या वरिष्ठ नेत्यांनी ठीकठिकाणी प्रचार सभा, प्रचार फेरी, आणि पत्रकार परिषदा घेतल्या. केंद्रीय मंत्री आणि भाजपाचे अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी नवी मुंबईत जाहीर सभा घेत, महायुतीच्या उमेदवारांना निवडून देण्याचं आवाहन मतदारांना केलं. तर शिवसेना नेते आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुंबईत वार्ताहर परिषद घेत महाविकास आघाडीवर टीका केली. भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी नागपूरमध्ये वार्ताहरांशी संवाद साधला. भाजपा नेते आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपूर, वर्धा आणि पुणे जिल्ह्यात जाहीर सभा घेतल्या. तर भाजपा नेते विनोद तावडे यांनी मुंबईत पत्रकार परिषद घेत महाविकास आघाडीच्या आरोपांना प्रत्युत्तर दिलं. राष्ट्रवादी कॉंग्रेसचे अध्यक्ष अजित पवार यांनी इंदापूर आणि बारामतीमध्ये जाहीर सभा घेत प्रामाणिक कामाला आणि विकासाला मत द्या, असं आवाहन मतदारांना केलं. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी वसई इथं प्रचारसभा घेत भाजपा महायुतीवर टीका केली. महायुतीच्या

काळात शेतकरी, कामगार, तरुण, महिला यांचं जगणं कठीण झालं असल्याचा आरोप त्यांनी केला. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी मुंबईत पत्रकार परिषदेत घेतली. तर राष्ट्रवादी कॉँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष, ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी बारामती इथं विधानसभा निवडणूक प्रचाराच्या सांगता सभा घेतली. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार आदित्य ठाकरे यांनीही मुंबईत पत्रकार परिषद महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनीही मुंबईत शिवडीमध्ये जाहीर सभा घेत आपल्या पक्षाची भूमिका मांडली.

**निवडा जनतेचा**

गेले जवळ जवळ 15 दिवस सुरू असलेल्या निवडणूक प्रचारामुळे राज्यातलं वातावरण ढवळून निघालं होतं. आता सर्वांनाच प्रतीक्षा आहे ती निकालाची. निवडणूक निकालाच्या दिवशी आकाशवाणीचा प्रादेशिक वृत्त विभाग सकाळी 9 वाजल्यापासून चर्चात्मक कार्यक्रम आणि निवडणूक निकाल विषयक **विशेष बातमीपत्र** प्रसारित करणार आहे; ऐकुया त्याविषयीचं हे निवेदन

**चोक्कलिंगम**

दरम्यान, उद्या 20 तारखेला होणाऱ्या मतदानासाठी निवडणूक यंत्रणा सज्ज झाली आहे. राज्यातील 288 विधानसभा मतदार संघांसाठी तसंच नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीसाठी उद्या मतदान होणार आहे. राज्यात 9 कोटी 70 लाख 25 हजार 119 मतदार असून; त्यांच्यासाठी 1,लाख 427 मतदान केंद्रांवर मतदानाची व्यवस्था करण्यात आली आहे. राज्यातल्या 288 जागांसाठी 4136 उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. सकाळी 7 ते संध्याकाळी 6 वाजेपर्यंत मतदानची वेळ असून राज्यातील मतदारांनी मोठ्या संख्येने मतदान करावं असं आवाहन मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी केलं आहे. या निवडणुकीसाठी मुक्त वातावरणात, निष्पक्ष आणि शांततेत मतदान पार पाडण्यासाठी पोलीस यंत्रणा देखील सज्ज आहे.

**मतदान जनजागृती**

निवडणुकीमध्ये मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी निवडणूक यंत्रणा तसंच विविध संस्था संघटना देखील अनेक उपक्रम राबवत आहेत. मतदारांच्या सोयीसाठी निवडणूक यंत्रणेनं मतदान केंद्रांवर अनेक उपाययोजना केल्या आहेत.

लोकसाहित्य आणि लोकसंस्कृतीच्या अभ्यासक तसंच दिल्लीत होणाऱ्या 98व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या नियोजित अध्यक्ष **डॉ.तारा भवाळकर** यांनीही राज्यातील सर्व मतदारांना मतदानकरण्याचं आवाहन केलं आहे. याबाबत आकाशवाणीशी बोलताना त्या म्हणाल्या -------

**पुणे जिल्हाधिकारी**

विधानसभा निवडणुकीसाठी उद्या होत असलेल्या मतदानाच्या पार्श्वभूमीवर निवडणूक यंत्रणेनं केलेल्या तयारी विषयी माहिती देण्यासाठी सर्वच जिल्ह्यांच्या जिल्हाधिकाऱ्यांनी काल पत्रकार परिषद घेतली. पुणे जिल्ह्यातील 21 विधानसभा मतदार संघासाठी 12523 पोलिसांची नियुक्ती करण्यात आली आहे. 6594 मतदान केंद्रांवर वेब कास्टिंगची सुविधा करण्यात येणार असल्याची माहिती पुण्याचे जिल्ह्याधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी काल पत्रकार परिषदेत दिली.

**निवडणूक हिंसाचार**

निवडणूक प्रचाराच्या शेवटच्या दिवशी काल राज्यात हिंसाचाराच्या दोन घटना घडल्या. नागपूर जिल्ह्यात काटोल इथं माजी गृहमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते अनिल देशमुख यांच्या गाडीवर दगडफेक झाली. देशमुख यांच्यावर नागपूरमधल्या रुग्णालयात उपचार करण्यात येत आहेत. त्यांनी प्रकृती स्थिर असून पोलिस या घटनेचा तपास करत आहेत अशी माहिती नागपूरच्या जिल्हाधिकाऱ्यांनी दिली. जळगांवमध्ये वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवारावर हल्ला झाल्याचं वृत्त आहे. या प्रकरणी दोषींवर कठोर कारवाई करण्यात येईल असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितलं.

**जी-20**

नवी दिल्लीत झालेल्या जी-20 शिखर परिषदेची एक वसुंधरा, एक कुटुंब, एक भविष्य ही संकल्पना अद्यापही समर्पक असल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं. ब्राझिलच्या रीओ दी जेनेरो शहरांत सुरु असलेल्या  जी-20 देशांच्या शिखर परिषदेत ते काल बोलत होते. या परिषदेच्या पार्श्वभूमीवर  पंतप्रधान मोदी यांनी ब्रिटन, इटली, फ्रांस, नॉर्वे, पोर्तुगल आणि इंडोनेशियाच्या प्रमुख नेत्यांची भेट घेऊन द्विपक्षीय चर्चा केली.

**सीतारामन**

बँकांनी सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग क्षेत्रासाठी आर्थिक वर्ष 2025-26 मध्ये 6 लाख 12 हजार कोटी तर 2026-27 मध्ये 7 लाख कोटी रुपये पतपुरवठा करण्याचं उद्दीष्ट ठेवावं असं केंद्रिय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटलं आहे. त्या काल मुंबईत 11 व्या एसबीआय बँकिंग अँड इकॉनॉमिक्स परिषदेत बोलत होत्या. विकसित भारताचं स्वप्न सत्यात आणण्याची आकांक्षा ही या परिषदेची संकल्पना आहे.

**होगाडे निधन**

वीज दर नियंत्रित रहावेत यासाठी सातत्याने लढा देणारे, या क्षेत्रातील तज्ज्ञ प्रताप होगाडे यांचं काल इचलकरंजी इथं निधन झालं. ते 74 वर्षांचे होते. महाराष्ट्र वीज ग्राहक संघटनेचे अध्यक्ष, आणि

समाजवादी पक्षाचे प्रदेश कार्याध्यक्ष या पदावर ते कार्यरत होते. मात्र त्यांची बहुतांशी राजकीय कारकीर्द जनता दलामध्ये घडली.

**हॉकी**
बिहारमध्ये सुरू असलेल्या महिला आशिया चषक हॉकी स्पर्धेच्या उपांत्य फेरीत आज भारताचा सामना जपानशी होणार आहे. तर दुसऱ्या उपांत्य सामन्यात चीन आणि मलेशिया यांच्यात लढत होणार आहे. या स्पर्धेतील पाचही सामने जिंकून भारत 15 गुणांसह अव्वल स्थानावर आहे.

**हवामान**
राज्याच्या बहुतांश भागात थंडीची चाहूल लागली आहे. अनेक जिल्ह्यात किमान तापमानात घट झाली आहे. काल अहिल्यानगरमध्ये सर्वात कमी म्हणजे 12 पूर्णांक 6 दशांश अंश सेल्सियस किमान तापमानाची नोंद झाली. येत्या 24 तासात राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**